पोलीस आयुक्त,छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालय
मिल कॉर्नर,डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर
पिन-431001. दुरध्वनी क्रमांक 0240-2240591
ई-मेल:-ps.splbranch.abad@mahapolice.gov.in

जा.क्र.वि.शा.-५/पोलीस भरती/मनाई आदेश/२०२४-2153 छत्रपती संभाजीनगर, दि.15/०६/२०२४

**विषय** :- पोलीस शिपाई व कारागृह शिपाई भरती 2022-23 भरती प्रक्रिया (मैदानी चाचणी) विभागीय क्रिडा संकुल सुतगिरणी, गारखेडा, परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 लागु करणे बाबत.

**आदेश :-**

ज्याअर्थी, पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर आस्थापनेवरील रिक्त असलेली 212 पोलीस शिपाई व मध्यवर्थी कारागृह, हर्सुल, छत्रपती संभाजीनगर विभागातील 315 कारागृह शिपाई भरती 2022-23 ही प्रक्रिया आयोजीत करण्यात आली असुन, सदर भरती प्रक्रियेतील उमेदवारांची शारीरिक मोजमाप, कागदपत्र पडताळणी व मैदानी चाचणी ही प्रक्रिया दिनांक 19/06/2024 ते 01/08/2024 या कालावधीत विभागीय क्रिडा संकुल सुतगिरणी, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर या मैदानावर होणार आहे.

पोलीस भरती प्रक्रिये च्या वेळी विभागीय क्रिडा संकुल सुतगिरणी, गारखेडा परिसर, छत्रपती संभाजीनगर या मैदानावर उमेदवार व उमेदवारांचे नातेवाईक मोठ्या प्रमाणात येवुन गर्दी करण्याची शक्यता असल्याने उमेदवार व उमेदवारांचे नातेवाईक यांचे अज्ञानाचा गैरफायदा घेवुन काही इसम उमेदवाराला पोलीस भरती करुन देतो असे खोटे आमिष दाखवुन फसवु शकतात तसेच गर्दीचा फायदा घेवुन अनोळखी इसम भरती प्रक्रियेमध्ये सामील होवु शकतो त्यामुळे उमेदवारांमध्ये अफवा पसरवुन गडबड गोंधळ होवुन भरती प्रक्रिये दरम्यान कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता दाट शक्यता नाकारता येत नाही याबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी **मी संदीप पाटील, पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर, पोलीस आयुक्तालय** मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन 1973 चे कलम 144 (3) अन्वये प्राप्त अधिकारा नुसार वरील मैदानी चाचणीचे परिसरात मी पुढील प्रमाणे आदेश निर्गमीत करीत आहे.

1. मैदाना पासुन 100 मिटर अंतरापर्यंत बाहेरील आवारात उमेदवार, पोलीस भरती संबंधी काम करणारे शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे खेरीज करुन इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner